चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी या अकादमीकरिता सन २०१५-१६ मध्ये सहाय्यक अनुदाने (योजनांतर्गत) वितरित करणे करिताचा नवीन बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१५/प्र.क्र.१७६/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०२ जानेवारी, २०१६

<u>वाचा</u> :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.१११/अर्थ-३, दि.३०.०६.२०१५.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.९३/१२२३, दि.०१.१०.२०१५.

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१५-१६ करिता “वन विभागात वन प्रशिक्षण केंद्राची स्थापना (४४१५ ०१७२)” या लेखाशीर्षाअंतर्गत एकूण रु.५०००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून त्यापैकी रु.३५००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर लेखाशीर्षाअंतर्गत चंद्रपूर येथील वन अकादमीकरिता सन २०१५-१६ मध्ये आवश्यक असलेला निधी देखिल अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

२. दरम्यानच्या कालावधीत, चंद्रपूर वन अकादमीकरिता नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन घेण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक ४४१५०१८१ असा आहे. सदर नवीन लेखाशीर्षाअंतर्गत रु.२००० रक्कमेची लाक्षणिक पूरक मागणी सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये मंजूर करण्यात आलेली आहे.

३. त्याअनुषंगाने, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.३ येथील दि.०१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये ४४१५०१७२ या संकेतांकामधून चंद्रपूर अकादमीकरिता ४४१५०१८१ या संकेतांकाअंतर्गत पुनर्विनियोजनाद्वारे निधी वळवून देण्याची विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे, चंद्रपूर वन अकादमीमधील पदांचे वेतन व भत्ते, अकादमीमधील विविध प्रकारचे वेतनेत्तर कामे आणि नवीन बांधकामे यांकरिता एकूण रु.२६६७.८० लक्ष रक्कमेचा नवीन बाब प्रस्ताव देखिल संदर्भ क्र.३ येथील दि.०१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे. चंद्रपूर येथील वन अकादमीकरिता प्राप्त झालेल्या नवीन बाब प्रस्तावाच्या अनुषंगाने ४४१५०१७२ या संकेतांकामधून ४४१५०१८१ या संकेतांकामध्ये निधी पुनर्विनियोजनाद्वारे वळविण्याची आणि निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

४. वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या परिपत्रकामध्ये अर्थसंकल्पित निधीच्या ७० % च्या मर्यादेत निधी वितरीत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने, संदर्भ क्र.३ येथील दि.०१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता "वनविभागात प्रशिक्षण केंद्राची स्थापना (४४१५०१७२) या संकेतांकामधून रु.३४३.८४ लक्ष इतका निधी “वन अकादमी चंद्रपूर (४४१५ ०१८१)" या लेखाशिर्षाअंतर्गत पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने

तातडीच्या कामांकरिता सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार एकूण **रु.३४३.८४ लक्ष (३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) - रु.२३३.०५ लक्ष व ३६, सहायक अनुदाने (वेतन) - रु.११०.७९ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील निधी खर्च करताना खालील अटी व शर्ती यांची पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी :-

I) संस्थेने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये मंजूर व वितरित अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमित ठेवावा.

II) सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर ती काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे. तसेच वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद अटींची आणि दि.३०.०६.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकामधील अटींची पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी.

III) संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

IV) फॉरेस्ट अॅकेडमी ऑफ अॅडमिनिस्ट्रशन, डेव्हलपमेंट अॅन्ड मॅनेजमेंट, चंद्रपूर या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकारी महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

६. उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधानशीर्ष - ४४१५ - कृषि विषयक संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६ वनीकरण, २७७- शिक्षण, (००) (०६) वन अकादमी चंद्रपूर (४४१५ ०१८१) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ करिता उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६३/१४७५, दि.०८.११.२०१५ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४४६/अर्थ-६/१५, दि.१५.१२.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८ /प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०२१५४३४०२५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.02 15:44:50 +05'30'

(डी.एल.थोरात)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) / (कार्मिक), म.रा.नागपूर.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) महा संचालक, वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर
७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
९) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, चंद्रपूर
११) फ-९/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विवरणपत्र

{३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)}

शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१५/प्र.क्र.१७६/फ-२, दि.०२.०१.२०१६

अ.क्र.	कामाचा तपशिल	मंजूर केलेली अंदाजपत्रकीय रक्कम (लाखात)
१ ए	दैनंदिन कामकाजासाठी कुशल व अकुशल मनुष्यबळ	४.८४
१ बी	वाहन चालक / चौकीदार यांना अतिकालीक भत्त्यावरील खर्च	१.०८
१ सी	प्रवास भत्ता	४.१०
१ डी	कार्यालयीन खर्च (दुरध्वनी, विज शुल्क, डाक मुद्रांक, गणवेष, संगणक व तद्अनुषंगीक साहित्य व इतर खर्च)	२५.१०
१ ई	बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येणा-या पदांचे मानधन	४.८६
१ एफ	वन प्रबोधिनीचे मालमत्ता कर, वृक्ष कर ई.	४०.२२
१ जी	अतिथ्य, समारंभ, स्मृतीचिन्ह व इतर बाबींवरील खर्च	०.६५
१ एच	पाईपलाईन दुरुस्ती करिता साहित्य पुरवठा व विद्युत साहित्य यावरील खर्च	२.५२
१ आय	मोटार वाहने दुरुस्ती, डिझेल, वंगण व सुटेभाग खरेदी, इमारत दुरुस्ती साहित्य	५.९८
१ जे	प्रशिक्षण सत्रातील वार्षिक कालावधी करिता व्याख्यात्याचे मानधन, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, शैक्षणिक सहल इ. बाबींवरील खर्च	५७.७०
३ ए	वसतिगृह व परिसराकरिता विद्युत साहित्य (सोलर बॅटरी, सोलर पॉवर पॅक, सोलर वॉटर हिटर, क्लासरुम मधील फर्निचर इ.)	५४.५०
३ बी	प्रशिक्षण साहित्य व उपकरणे (पुस्तके, शैक्षणिक साहित्य, संगणक, टेलिस्कोप, कार्यालयीन खर्च इ.)	३१.५०
	एकूण	**२३३.०५**